# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यात अपंग पुनर्वसन कायदयानुसार महानगरपालिकांच्या मार्केटमधील ३ टक्के गाळे अपंगांना देण्याबाबत**

**(१) ३६४० (२३-१२-२०१४). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अपंगपुनर्वसन कायदयानुसार महानगरपालिकांच्या मार्केटमधील ३ टक्के गाळे अपंगांना देणे तसेच अपंगांची दैनंदिन नोंद करणे बंधनकारक असतानाही त्याची अंमलबजावणी होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कायद्याची अंमलबजावणी तातडीने न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जुलै, २०१४ रोजी वा त्या सुमारास सचिव, नगरविकास यांना दिला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) शासकीय योजनांनुसार जमिन वाटप करतांना दिव्यांग व्यक्तींना विहित आरक्षणानुसार सवलतीच्या दराने वाटपात प्राधान्य देण्याबाबत दि.२८/१२/२००६ च्या शासन परिपत्रकान्वये सर्व महानगरपालिका/नगरपालिका यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे दिव्यांग बांधवांची नोंद करण्याबाबत दि.०४/१०/२०१३ च्या परिपत्रकान्वये सर्व महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद यांना कळविण्यात आले असून, त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठीही दि.२०/०८/२०१५ च्या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना कळविले आहे. तसेच दिव्यांग व्यक्तींच्या योजनांबाबत नियमितपणे आढावा घेण्याच्या सूचना सर्व विभागीय आयुक्त यांना देण्यात आलेल्या आहेत.

---

### क्रस्टल ई कंपनीच्या संचालकाने करारातील शर्ती व अटींचा भंग असल्याबाबत

**(२) १८९९९ (११-०८-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेने (जि.ठाणे) सन २०१० मध्ये क्रस्टल ई कंपनीला बी.ओ.टी. तत्वावर काही अटी व शर्तीवर कंपनीचे संचालक श्री. राजा गेमनानी यांना खाजगी बस सुरु करण्यास परवानगी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रस्टल ई कंपनीच्या संचालकाने करारातील शर्ती व अटींचा भंग केल्यामुळे त्यांच्याकडून खाजगी बस चालविण्याचे बंद करण्यात आले व त्यांना काळया यादीत टाकण्याचा निर्णय सन २०१३ मध्ये वा त्या दरम्यान उल्हासनगर महानगरपालिकेने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बस थांब्याकरीता घेतलेली उल्हासनगर - ५ येथील महानगरपालिकेची जागा काही अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने हडप करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत तक्रार संबंधित लोकप्रतिनिधींनी दिनांक २० फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री व प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली असून संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-११-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) राजा गेमनानी यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका कमांक ७८६२/२०१४ मध्ये मा.न्यायालयाच्या दिनांक २४.०७.२०१७ रोजीच्या आदेशान्वये सदर जागेवरील स्थगिती उठविण्यात आली असून, उल्हासनगर महानगरपालिकेने सदर जागा दिनांक ०२.०८.२०१७ रोजी ताब्यात घेतली आहे.

---

### मानखुर्द, गोवंडी (मुंबई पूर्व उपनगर) येथील नागरिकांना त्यांच्या वास्तव्याचे पुरावे वितरीत करण्याबाबत

**(३) २२८५७ (११-०८-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द, गोवंडी (मुंबई पूर्व उपनगर) स्थानिक विभागातील तसेच विधानसभा क्षेत्रातील नागरिकांना त्यांच्या वास्तव्याचे झोपडीधारक पुरावे (फोटोपास) तातडीने वितरीत करण्याची मागणी स्थानिक जागरुक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री, राज्यमंत्री (नगरविकास), जिल्हाधिकारी (मुंबई पूर्व

उपनगरे), उपजिल्हाधिकारी अति/निष्का विभाग, चेंबूर, आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका, अतिरिक्त आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका पूर्व उपनगरे आयुक्त (बृ.मुं.मनपा/पूर्व उपपगरे), सहाय्यक आयुक्त (एम/पूर्व बृ.मुं.मनपा) यांच्याकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी माहे मे, २०१५ अखेर पर्यंत कोणती कार्यवाही पूर्ण करण्यात आली वा येत आहे,
(३) असल्यास, सदरचे काम किती कालावधीत हाती घेण्यात येईल वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-११-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) दिनांक २२.०७.२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार जानेवारी, २०१५ ते मे, २०१५ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जागेवरील एकूण ५३ झोपडीधारकांना फोटोपास वितरीत करण्यात आले आहेत.

---

**नालासोपारा येथील ( जि. ठाणे) हनुमाननगर मधील २८ बेकायदा इमारती पाडण्यात आल्याबाबत**

**(४) ३९०५७ (२१-०१-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नालासोपारा येथील ( जि. ठाणे) हनुमाननगर मधील सर्व्हे नंबर ३२ मधील चार मजल्यांच्या २८ बेकायदा इमारती पाडण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चार-पाच वर्षांपासून शासकीय जमिनीवर मोठ्या प्रमाणात चार मजली त्यांच्या २८ इमारती बांधल्या असून त्यावर शासनाने कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्या ठिकाणी बेकायदा इमारती बांधून घरे विकून रहिवाशांची फसवणूक केल्याप्रकरणी विकासकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-११-२०१७) :**(१), (२) व (३) वसई विरार शहर महानगरपालिकेने खालीलप्रमाणे कळविले आहे:-

- माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये नालासोपाऱ्यातील हनुमाननगर येथील सर्व्हे नंबर ३२ मधील तळमजला + ४ च्या ५ इमारती तहसिल व महानगरपालिकेच्या समन्वयाने निष्कासित केल्या आहेत.
- सदरच्या अनधिकृत इमारतींच्या विकासकांना महानगरपालिकेने MRTP अंतर्गत नोटीसा दिल्या आहेत.

- उर्वरीत २३ इमारतीमध्ये नागरिकांचा रहिवास असून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्याने कार्यवाही स्थगित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील सायन प्रतिक्षानगर येथे विक्रेत्यांवर अनधिकृत बांधकाम मोहीमेअंतर्गत महानगरपालिका प्रशासनाने कारवाई केल्याबाबत**

**(५) ५२३९२ (१७-०५-२०१६). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सायन प्रतिक्षानगर येथे भाजी, मच्छी व इतर छोटे -मोठे व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांवर अनधिकृत बांधकाम मोहीमेअंतर्गत महानगरपालिका प्रशासनाने कारवाई केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील विक्रेत्यांसाठी वेगळे भाजी मार्केट बांधण्याचे म्हाडाने आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आश्वासनानुसार येथील विक्रेत्यांसाठी वेगळे भाजी मार्केट बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-११-२०१७) :**(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सायन प्रतिक्षानगर येथे रस्ते व रस्त्यालगतच्या नाल्यावर असलेल्या अनधिकृत विक्रेत्यांवर दिनांक ११.०१.२०१६ व दिनांक १२.०१.२०१६ रोजी निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नेहरु नगर (कुर्ला) येथे नाल्याची संरक्षक भिंत खचल्याने ५० घरे व दुकाने जमीनदोस्त झाल्याबाबत**

**(६) ६२६४४ (२९-०८-२०१६). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला-नेहरुनगर(मुंबई) येथील नाल्याची संरक्षक भिंत दिनांक २५ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास खचल्याने सुमारे ५० घरे व दुकाने जमीनदोस्त झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नुकसानग्रस्तांना कोणत्या स्वरुपाची मदत करण्यात आली वा करण्यात येत

आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१७) :**(१), (२) व (३) कुर्ला-नेहरु नगर येथील नाल्याची संरक्षक भिंत सरकल्यामुळे एकूण २२ बांधकामे नाल्यामध्ये कोसळली आहेत.

सदर दुर्घटनेत बाधीत झालेली दुकाने अनिवासी गाळे असल्याने तसेच सदर घटना नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडत नसल्याने आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.

---

**कुर्ला कलिना (जि.मुंबई) येथील कल्पना टॉकीज समोरील मिठी नदीवरील पुलाचे बांधकाम अपूर्ण असल्याबाबत**

**(७) ६५३५३ (१६-०१-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्ला कलिना (जि.मुंबई) येथील कल्पना टॉकीज समोरील मिठी नदीवरील पुलाचे काम अपूर्ण असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पुलाचे काम अर्धवट राहण्यामागील कारणे काय आहेत तसेच या कामाकरिता किती निधीची तरतुद करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) असल्यास, उक्त पुलाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर कामाकरिता रु. १०.५७ कोटी किंमतीच्या निविदा मागविण्यात आल्या असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पामध्ये रु. ३ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

---

**नाशिक विकास आराखडयावर सूचना व हरकती मागविण्याबाबत**

**(८) ७४६६४ (२१-०४-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक विकास आराखडयाची अधिसूचना शासनाच्या नगर विकास विभागाने निर्गमित केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रसिध्द केलेल्या अंतिम विकास आराखडयातील विविध ७७ आरक्षणांमध्ये सुधारणा केली असून त्यातील ३१ आरक्षणे वगळण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यात प्रामुख्याने बगीचे, प्रदर्शनीय मैदान यासारखी सार्वजनिक आरक्षणे वगळण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे सदर आराखडा वादग्रस्त ठरणार असल्याने या विकास आराखडयावर सूचना व हरकती मागविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१७) :**(१) होय.

शासनाने दि.०९.०१.२०१७ च्या अधिसूचनाअन्वये भागश: विकास योजना मंजूर केली असून, भागश: विकास योजना पुनर्प्रसिध्द केलेली आहे.
(२), (३) व (४) शासनाने भागश: मंजूर केलेल्या विकास योजनेमध्ये ७८ फेरबदल मंजूर करण्यात आलेले असून व पुनर्प्रसिध्द केलेल्या भागश: विकास योजनेमध्ये ७९ सारभुत फेरबदल प्रस्तावित केलेले आहेत व सदरचे सारभुत फेरबदलाच्या अनुषंगाने जनतेच्या हरकती व सूचना मागविलेल्या असून प्राप्त झालेल्या हरकती सूचनांना सुनावणी देवून शासनास अहवाल सादर करण्यासाठी सहसंचालक नगर रचना नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती केलेली आहे. सारभूत स्वरुपाचे बदल (ईपी) एकुण ७९ असून त्यावर प्राप्त होणाऱ्या हरकतदाराना सुनावणी देऊन नियुक्त अधिकारी यांचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर गुणवत्तेनुसार उक्त सारभूत स्वरुपांच्या बदलांवर अंतिम निर्णय घेण्यात येईल.
(५) लागू नाही.

---

## मुंबईत अनेक ठिकाणच्या बस थांब्यावर छप्पर नसल्याबाबत

**(९) ७५५१६ (२१-०४-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेस्ट (बी.ई.एस.टी) तर्फे मुंबई, ठाणे, नवी मुंबई, मीरा भाईंदर अशा विविध भागात बस सेवा चालविली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रवाशांच्या सेवेसाठी व सुविधेसाठी बस थांबे, बस खांबे पुरविले जातात व उपलब्ध असणाऱ्या जागेनुसार बस थांब्यांना छप्पर पुरविले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईत अनेक ठिकाणच्या बस थांब्यावर छप्पर नसल्याने उन्हाळ्यात, पावसाळ्यात प्रवाश्यांचे हाल होत असल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर ठिकाणच्या बस थांब्यावर छप्पर बसवून प्रवाश्यांचे हाल थांबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) मुंबईत काही ठिकाणी पदपथावरील जागेच्या अनुपलब्धतेमुळे तसेच काही तांत्रिक बाबींमुळे बस थांब्यांवर आश्रयस्थान उभारणे शक्य झालेले नाही.

तथापि, पुरेशी जागा उपलब्ध असलेल्या बसथांब्यांवर बस आश्रयस्थान उभारण्याचे काम बेस्ट प्रशासनामार्फत सुरु आहे.

मुंबई लगतच्या शहरांमधील बेस्ट उपक्रमाच्या बससेवेचे बसथांबे प्रामुख्याने त्या शहरातील स्थानिक बससेवांसमवेत देण्यात आले असून, या बसथांब्यांवर बस आश्रयस्थान उभारणीचे काम स्थानिक महानगरपालिकांमार्फत करण्यात येते.

---

**उल्हासनगर महानगरपालिकेकडून (जि.ठाणे) शहरातील बेकायदा बांधकामावरील होत असलल्या कारवाईचा अहवाल शासनास नियमित पाठविण्याबाबत**

**(१०) ७६३७० (२०-०४-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेकडून शहरातील बेकायदा बांधकामावरील कारवाईचा दर आठवड्याचा अहवाल शासनास पाठविला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील दोन वर्षात उक्त अहवाल शासनास उल्हासनगर महानगरपालिकेकडून सादर केला गेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अहवाल शासनास सादर केला जात नसल्याने उल्हासनगर शहरात बेकायदा बांधकामे वाढल्याचे निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उल्हासनगर शहरातील बेकायदा बांधकामांवर अंकुश ठेवण्याच्या दृष्टीकोनातून उक्त अहवाल शासनास नियमितपणे प्राप्त होण्याकरिता शासनस्तरावरून काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१७) :**(१), (२) व (३) उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात अनधिकृत बांधकामे आढळल्यानंतर सदर बांधकामे निष्कासित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी करण्यात येते.

तसेच, महानगरपालिकेमार्फत अनधिकृत बांधकामे करणाऱ्यांवर एम.आर.टी.पी. कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात येतात.

सन २०१६ ते एप्रिल २०१७ पर्यंत महानगरपालिकेमार्फत सुमारे १८२ बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.
(४) व (५) बेकायदा बांधकामावरील कारवाईचा अहवाल शासनास नियमितपणे पाठविण्याकरिता आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना दिनांक २९.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

---

## मुंबईतील झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काचे उतारे देण्याबाबत

**(११) ७७७६१ (१२-०४-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान आवास योजनेच्या अमंलबजावणीसाठी झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काचे उतारे देण्याबाबत शासनाने मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयास निर्देश दिल्यानंतरही उक्त कार्यालयाकडून उतारे देण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.उच्च न्यायालयानेही झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काचे उतारे देण्याबाबत आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काचे उतारे तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०२-११-२०१७) :**(१) अशी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अभिलेख़ात उपलब्ध नसल्याचे जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी कळविले आहे.

(२) व (३) मा.उच्च न्यायालयाने, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.२८.१.२०११ च्या सार्वजनिक वापरातील जमीनी/ गायरान जमीनी इतर प्रयोजनार्थ वापरण्यावर निर्बंध घालण्याबाबतचा निर्णय तसेच त्या संदर्भातील शासनाच्या महसूल विभागाने निर्गमित केलेल्या दि.१२.७.२०११ चा शासन निर्णयाच्या अनुषंगाने सत्वर उचित कार्यवाही करण्याचे आदेश दि.२३.६.२०१५ रोजी दिले आहेत.

त्याचप्रमाणे, पात्र झोपड्पट्टीवासियांना त्यांच्या भोगवट्याखालील जमिन भाडेपट्ट्यावर देउन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबतच्या शासनाच्या दि. १०-०७-२००२ च्या शासन निर्णयामध्ये शासनाच्या दि. १६-७-२०१६ व दि. ३-१-२०१७ च्या शासन निर्णयान्वये काही सुधारणा करण्यात आल्या आहेत. मात्र सदर तरतुदी मुंबई, ठाणे, पुणे व पिंपरी-चिंचवड या शहरांना लागू नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भांडूप (प.) येथील खिंडीपाडा, हनुमान नगर, राम नगर, गावदेवी टेकडी, तुळशेतपाडा व काजू टेकडी हा परिसर कठीण क्षेत्र घोषित करण्याबाबत

**(१२) ७७८६६ (०६-०५-२०१७). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप (प.), मुंबई-७८ मतदार संघातील रमाबाई नगर १, २, ३ खिंडीपाडा, हनुमान नगर, राम नगर, गावदेवी टेकडी, तुळशेतपाडा व काजू टेकडी ह्या वसाहती डोंगराळ भागात वसलेल्या असल्याने त्या बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१ च्या ३३ (१०) परिशिष्ट क्र.४, कलम ३.१९ मधील तरतूदीनुसार सदर क्षेत्र कठीण क्षेत्र घोषित करण्याबाबत मा.गृहनिर्माण मंत्री यांच्या निदेशानुसार त्या परिसरातील लोकप्रतिनिधींनी उपजिल्हाधिकारी

(पू.उ.), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे (पूर्व) मुंबई यांच्याकडे दिनांक १३ सप्टेंबर,२०१६ रोजी वा त्या सुमारास पत्राव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने उपजिल्हाधिकारी (पू.उ.) यांनी वरील वसाहतीची सक्षम पाहणी करुन आवश्यक भूखंडाचे नभुक्र, भूखंडाचे क्षेत्रफळ तसेच सदर भूखंडावर असलेल्या झोपडीधारकांची संख्या तसेच सेझ वर वसाहतीचे स्थान दर्शवून नकाशासह प्राधिकरणास सादर करण्याबाबत उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) यांना दिनांक १२ जानेवारी,२०१७ रोजी पत्राव्दारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) यांनी आतापर्यंत काय कार्यवाही केली व याबाबतची सविस्तर माहिती प्राधिकरणाकडे पाठविली आहे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (०२-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्रधिकारी, भांडूप यांनी प्रत्यक्ष स्थळपहाणी करून त्या आधारे न.भू.क्र. व त्याखालील क्षेत्र, झोपडीधारक यांची माहिती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सादर केली आहे.प्राधिकरणा मार्फत सदर अहवालाची विकास नियंत्रण नियमावली मधील तरतूदीनुसार छाननी करून पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

## मुंबई शहर व उपनगरातील संक्रमण शिबिरातील पर्यायी निवासस्थाने मूळ रहिवाश्यांकडून विकत घेतलेल्या रहिवाश्यांच्या नावाने घरे करण्याचे धोरण

**(१३) ७७९०६ (२१-०४-२०१७). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व उपनगरातील संक्रमण शिबीरातील पर्यायी निवासस्थाने मूळ रहिवाश्यांकडून विकत घेतलेल्या रहिवाश्यांच्या नावाने करण्याचे धोरण ठरविण्यासाठी शासनाने मंत्रीमंडळाची उपसमिती नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीचे सदस्य कोण आहेत व समितीचा अहवाल शासनास सादर करावयाची कालमर्यादा काय आहे,
(३) असल्यास, शासन निर्णयाच्या अनुषंगाने उपसमितीचे कामकाज सुरु झाले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

गृहनिर्माण विभागात धोरण ठरविण्यासाठी मंत्रीमंडळ उपसमिती स्थापन करणेबाबत या विषयाच्या अनुषंगाने दि. ०९ जानेवारी, २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(२) सदर समितीचे सदस्य खालीलप्रमाणे आहेत :-

| | | |
|---|---|---|
| १ | मा.मंत्री,गृहनिर्माण | अध्यक्ष |
| २ | मा.श्री.दिवाकर रावते, मंत्री परिवहन, खार भूमी विकास | सदस्य |
| ३ | मा.श्री.विनोद तावडे, मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ | सदस्य |
| ४ | मा.श्री.रविंद्र वायकर, राज्यमंत्री, गृहनिर्माण | सदस्य |
| ५ | मा.श्रीमती विद्या ठाकूर, राज्यमंत्री, महिला व बालविकास | सदस्य |
| ६ | मा.श्री.रविंद्र दत्तात्रय चव्हाण, राज्यमंत्री, बंदरे, वैद्यकीय शिक्षण, माहिती तंत्रज्ञान, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण | सदस्य |

उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार अशी कोणतीही कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील शेगाव विकास आराखडयांतर्गत बसविण्यात आलेले नविन पथदिवे बंद असल्याबाबत**

**(१४) ८०९२५ (२०-०४-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील शेगाव विकास आराखडयांतर्गत हजारो रुपये किंमतीचे बसविण्यात आलेले नविन पथदिवे बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे पथदिवे बंद असण्याची कारणे काय आहेत व त्यास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७) :**(१) व (२) अंशत: खरे आहे

शेगांव विकास आराखडयांतर्गत नगरपरिषदेच्या हद्दीत व हद्दीबाहेर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पथ दिवे लावण्यात आले आहेत. त्यातील नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये लावण्यात आलेले पथ दिवे चालू स्थितीत असून, नगरपरिषद हद्दीबाहेरील पथ दिव्यांना संबंधित ग्राम पंचायतीतर्फे विज पुरवठा देण्यास नकार दिल्यामुळे काही पथ दिवे बंद आहेत. तथापि, सदर क्षेत्र आता नगरपरिषद हद्दीमध्ये समाविष्ट झाले असून सदर पथदिवे सुरू करण्याची कार्यवाही नगरपरिषदेमार्फत सुरू करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहरातील हॉस्पिटलमधील बायोमेडिकल वेस्टची नोंदणी महानगरपालिकेकडे केली नसल्याबाबत**

**(१५) ८०९४७ (२१-०४-२०१७). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहरातील हॉस्पिटलमध्ये जमा होणाऱ्या बायोमेडिकल वेस्टची नोंदणी करणे बंधनकारक आहे मात्र शहर आणि उपनगरातील आठ ते साडेआठ हजार डॉक्टरांपैकी अवघ्या दोन ते अडीच हजार डॉक्टरांनी महानगरपालिका प्रशासनाकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये मध्ये वा त्या दरम्यान नोंद केल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास,संबधित डॉक्टरांनी महानगरपालिका प्रशासनाने केलेल्या आवाहनाला अपेक्षित प्रतिसाद दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉक्टर बायोमेडिकल वेस्ट कचराकुंडीतच टाकत असल्याने सर्वसामान्यांचे आरोग्याच धोक्यात आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बायोमेडिकल वेस्ट नोंदणी न केलेल्या डॉक्टरांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

माहे सप्टेंबर, २०१७ अखेर ४४७८ वैद्यकीय आस्थापना जैव वैद्यकीय कचरा निमुर्लनाच्या मध्यवर्ती सुविधेचा लाभ घेत आहेत.

(३) रूग्णालये/दवाखाने/क्लीनीक मधील आरोग्यदृष्ट्या धोकादायक कचरा गोळा करण्याकरीता कलर कोडनुसार पिवळ्या आणि लाल रंगाच्या बायोडीग्रेबल पिशव्या वापरल्या जातात आणि त्याचे वजन काटेकोरपणे होण्याचे दृष्टीने रूग्णालये/दवाखाने/क्लीनीक यांना स्वतंत्रपणे बारकोड देण्यात आले आहेत. तसेच जैववैद्यकीय कचऱ्याचे वजनानुसार शुल्क निश्चित करण्यात आले असून ते संबंधीत रूग्णालये/दवाखाने/क्लिनीक यांचेकडून आकारण्यात येत आहे.

(४) जे दवाखाने/क्लिनीक सदर सेवेचा लाभ घेत नाहीत अशा दवाखाने/क्लिनीक यांना पुणे मनपामार्फत राबविण्यात येणाऱ्या जैववैद्यकीय कचऱ्याचे विल्हेवाटीबाबतचे सेवेत सहभागी होणेकरीता प्रोत्साहीत केले जाते. तसेच विविध वैद्यकीय संघटना, जनरल प्रॅक्टीशनर्स असोसिएशन, इंडीयन मेडीकल असोसिएशन यांचे पदाधिकाऱ्यांसमवेत बैठका घेण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत खडीचा पुरवठा होऊनही रस्त्यांची कामे अपूर्ण असल्याबाबत**

**(१६) ८४८७३ (२३-०८-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत खडीचा पुरवठा होऊनही मुंबईतील रस्त्यांची कामे अपूर्ण असल्याचे माहे जून, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार मुंबईतील रस्त्यांची कामे पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१७) :**(१) हे खरे नाही.

मुंबईत खडीचा पुरवठा साधारणत: एप्रिल २०१७ च्या पहिल्या आठवडा ते दिनांक ९ मे, २०१७ या कालावधीत पूर्णपणे विस्कळीत झाला होता.

मुंबई विभागात येणारी बहुतांश खडी तसेच मुंबई विभागात येणारे डब्ल्यू. एम. एम., आर. एम. सी. व अस्फाल्ट हे रस्ते बांधणीचे साहित्य बहुतांशी तुर्भे व नवी मुंबई या विभागातून येते.

तसेच, आर.एम.सी. व अस्फाल्ट तयार करणारे महानगरपालिका मान्यताप्राप्त प्लांट दिनांक ९ मे, २०१७ नंतर सुरु झाल्यावर रस्ते बांधणीचे साहित्याचा पुरवठा सुरु झाला.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत जून २०१७ पर्यंत रस्त्यांची कामे पूर्ण करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे:-

| विभाग | सुरु असलेली कामे | पूर्ण झालेली कामे |
|---|---|---|
| शहरे | १६२ | ९९ |
| पूर्व उपनगरे | १८३ | १२५ |
| पश्चिम उपनगरे | ४७० | १६५ |

रस्त्यांच्या निविदेअंतर्गत अटी व शर्तीनुसार रस्त्यांची कामे पूर्ण करण्याचा कालावधी संपला नसून, पावसाळयात सदर कामे स्थगित ठेवण्यात आली आहेत.

सदर रस्त्यांची कामे पावसाळयानंतर सुरु करण्यात येणार आहेत.

---

**भांडुप (प) येथील नाहुर गावात सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारण्याबाबत**

**(१७) ८४८७७ (२३-०८-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडुप (प) येथील नाहुर गावात सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर भूखंडाच्या १०,५५६ चौ.मी. इतक्या क्षेत्रफळावर सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारण्याकरिता महानगरपालिकेमार्फत वास्तुशास्त्रज्ञ व आरोग्य सल्लागार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

त्यानुसार सदर भूखंडावर सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे आराखडे तयार करण्यात आले आहेत. सदर आराखडयास अंतिम स्वरुप देण्याचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु असून, तद्नंतर निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे.

---

**पिंपरी विठ्ठलनगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांच्या**
**इमारतीतील सदनिकांचे वाटप न झाल्याबाबत**

**(१८) ८४८८५ (२३-०८-२०१७). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी महानगरपालिकेने विठ्ठलनगर येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प अंतर्गत सदर ठिकाणी सात मजल्यांच्या सात इमारती बांधल्या असून २१४ सदनिकांचे वाटप न झाल्यामुळे त्याचा वापर झोपडपट्टीवासीय शौचालयाकरिता करीत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वच्छ भारत अभियानाचे राज्यस्तरीय पथकाने या ठिकाणी दौरा केला असून अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७)** :(१) विठ्ठलनगर पुनर्वसन योजनेअंतर्गत एकूण १३ इमारती बांधून तयार आहेत. त्यातील ११ इमारतींचे वाटप पूर्ण झाले आहे व लाभार्थी त्यामध्ये राहत आहेत. उर्वरित २ इमारती वाटपासाठी शिल्लक असून वेळोवेळी लाभार्थ्यांनी स्वहिस्सा भरलेला आहे. तथापी काही लाभार्थ्यांकडून स्वहिस्सा भरलेला नाही. सर्व लाभार्थ्यांकडून स्वहिस्सा भरला गेलेनंतर सदनिकांचे वाटप करण्याचे प्रयोजन आहे.
(२) व (३) स्वच्छ भारत अभियानाच्या राज्यस्तरिय पथकाने दि.१६/०५/१७ ते दि.१८/०५/१७ या कालावधीत दौरा केला आहे.

या बाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत स्वच्छता दूत नेमण्यात आले असून संपूर्ण परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेच्या मिळकत कर वसुली भरणा करण्यासाठी राबविलेल्या**
**अभय योजनेच्या प्रबोधनात झालेला गैरव्यवहार**

**(१९) ८५१९७ (२३-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या मिळकत कर वसुली भरणा करण्यासाठी राबविलेल्या अभय योजनेच्या प्रबोधनासाठी १५ रिक्षांकरिता तब्बल ४८,०६,०००/- रुपये खर्च करण्यात आल्याची बाब माहे जून, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रिक्षांसाठी करण्यात आलेला लक्षावधी खर्च पाहता यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असतांना ठेकेदारांची बिले महानगरपालिका प्रशासनाने अदा केली असून शासनाने याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७)** :(१) व (२) मिळकत कर वसूली व भरणा करण्यासाठी नागरिकांना प्रबोधन व आवाहन करण्यासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत रीतसर ऑनलाईन जाहीर निविदा मागवून भाडेतत्वावर १५ रिक्षा उपलब्ध करून घेण्यात आल्या होत्या.

रिक्षा उपलब्ध करून घेणे तसेच वाहनचालक, इंधन, अपघात, बिघाड देखभाल, दुरूस्ती, ध्वनीक्षेपण यंत्रणा, ई. खर्चासाठी एकूण रू.४८,०६,०००/- या रक्कमेपैकी रू.२६,६४,९००/- चे बिल अदा केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील समुद्रकिना-यावरील सुरक्षेतेबाबत

**(२०) ८५२०९ (२३-०८-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील समुद्रकिना-यावर पर्यटक सेल्फी काढण्यासाठी जात असतांना अनेक घटना घडत असल्याने त्या ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमण्याची मागणी माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान सहा.आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील आक्सा बीच या ठिकाणी येणाऱ्या शेकडो पर्यटकांच्या सुरक्षेसाठी केवळ आठ जीवरक्षक तैनात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे या ठिकाणी पर्यटकांचा बुडून मृत्यू होण्याच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे समोर आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, पर्यटकांना आवरताना सदर जीवरक्षकांना कठीण जात असून आक्सा बीच या ठिकाणी पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने जीवरक्षकांची नियुक्ती करण्याकरिता शासन काय कार्यवाही करणार आहे,

(५) तसेच, प्रश्न भाग (१) मधील मागणीनुसार सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०१७)** :(१) सदर ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमण्याची मागणी करणारे कोणतेही पत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही.

(२) मुंबईतील आक्सा बीच या ठिकाणी पर्यटकांच्या सुरक्षेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ९ जीवरक्षक तैनात ठेवण्यात आले आहेत.
(३) हे खरे नाही.
(४), (५) व (६) मुंबईतील समुद्र किनाऱ्यांवर जीवरक्षकांच्या सेवा पुरविण्यासाठी बाह्य संस्थांची नेमणुक करण्याकरिता महानगरपालिकेमार्फत ई-निविदा सूचना सार्वजनिक जाहिरातीद्वारे प्रसारीत करण्यात आली आहे.

---

**मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल रेल्वे स्थानकाजवळील सोमाणी मार्गाचे रुंदीकरण करण्याबाबत**

**(२१) ८५३८७ (२३-०८-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल रेल्वे स्थानकात (सीएसटीएम) उतरणारे लाखो प्रवासी स्थानकाजवळ असलेल्या कॅपिटल चित्रपटगृहालगत असलेल्या हजारीमल सोमाणी मार्गावरुन फॅशन स्ट्रीट, चर्चगेट, नरिमन पॉईंट व आसपासच्या भागात पायी चालत जात असून नरिमन पॉईंट, मंत्रालय येथून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल मार्गे भायखळ्याच्या दिशेला जाण्यासाठी लाखो वाहनचालक याच मार्गाचा वापर करीत असल्यामुळे पादचारी व वाहन यांची गर्दी होत असल्यामुळे मुंबई महानगरपालिकेने सोमाणी मार्गाचे रुंदीकरण करण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मार्गालगत असलेल्या आझाद मैदानात काही शासकीय कार्यालये असून या कार्यालयासमोर असलेली मोकळी जागा, रस्ता रुंदीकरणाच्या आड येत असल्याने सदरची जागा महानगरपालिकेला हस्तांतरित करावी अशी विनंती मुंबई महानगरपालिकेने शासनाकडे माहे एप्रिल-मे, २०१७ वा त्या दरम्यान केली होती, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, आझाद मैदानातील शासकीय कार्यालयासमोरील मोकळी जागा मुंबई महानगरपालिकेला न मिळाल्यामुळे तसेच बॉम्बे जिमखाना आणि आझाद मैदानाचा काही भाग रस्त्यासाठी देण्यास शासनाकडून प्रचंड विलंब झाल्यामुळे रस्ता रुंदीकरणाचे काम रद्द करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रस्ता रुंदीकरण न झाल्यामुळे उपलब्ध असलेल्या अरुंद रस्त्यावरुन चालताना लोकांची प्रचंड गर्दी होत असल्यामुळे लोकांमध्ये असंतोष पसरला असून रस्त्याचे रुंदीकरण तातडीने करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-११-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) सदर जागा जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत न झाल्यामुळे हजारीमल सोमाणी मार्गाच्या रुंदीकरणाचे काम रद्द करण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे.

---

**रघुवंशी मिल, लोअर परेल (मुंबई) या गिरणीच्या जागेवर**
**नियमबाह्य बांधकाम करण्यात आल्याबाबत**

**(२२)** *८५५४६* **(२३-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रघुवंशी मिल, लोअर परळ (मुंबई) या गिरणीच्या जागेवर नियमबाह्य बांधकाम करण्यात आले असून विनापरवानगी इमारती व हॉटेल्स उभारण्यात आले असल्याची गंभीर बाब माहे जून, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गिरणीमधील तलाव, भोंगे यांना हेरीटेज दर्जा असतानाही ती नामशेष करण्यात आली असून सदरहू गिरणीमध्ये करण्यात आलेल्या बांधकामामुळे येथिल ऐतिहासिक तलावाचे अस्तित्व देखील नष्ट होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू गिरणीच्या जागेवर सुरु असलेल्या बांधकामातील अनियमिततेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे त्यानुसार सदर प्रकरणातील दोषींवर शासनाकडून आजतागायत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-११-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) लोअर परेल येथील रघुवंशी मिल परिसरात सद्य:स्थितीत कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम सुरु नसून, अनधिकृत बांधकामांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ अंतर्गत वेळोवेळी निष्कासनाची कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना चिक्कीचा पुरवठा करण्याबाबत**

**(२३)** *८५५७०* **(२३-०८-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना सन २००७ पासून सुगंधी दुध दिले जात होते त्यामुळे विद्यार्थ्यांच्या पोटात मळमळणे, उलट्या होण्याचा त्रास होत असल्यामुळे दुधाचे वाटप बंद करण्यात आले व या सुगंधी दुधाला पर्याय म्हणून विद्यार्थ्यांना चिक्की देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच वेळी महानगरपालिकेच्या साडेचार लाख विद्यार्थ्यांना चिक्की पुरवू शकेल असा कंत्राटदार मिळत नसल्याने ही चिक्की वर्षभरात विद्यार्थ्यांना मिळू शकली नाही असे दिनांक १० एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेतील विद्यार्थ्यांना चिक्की मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) सुगंधी दुधाला पुरक आहार म्हणून चिक्कीचा पुरवठा करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मान्यताप्राप्त देकारदाराकडून चार वेळा ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

तथापि, पुरेसा प्रतिसाद न मिळणे, ई.एम.डी. न भरणे, निविदेतील नमुद कागदपत्रे सादर न करणे इत्यादी कारणांमुळे सदर निविदा रद्दबातल झाल्या.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना चिक्कीऐवजी पुरक आहार म्हणून भाजलेले चणे/शेंगदाणे विद्यार्थ्यांना देण्याबाबत स्वतंत्र प्रस्ताव महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे.

---

## महर्षीनगर-गंगाधाम (जि.पुणे) परिसरात ओढे नाल्यांची दिशा वळवून व नाले बुजवून गृहप्रकल्प सुरु असल्याबाबत

**(२४) ८५५९१ (२३-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महर्षीनगर-गंगाधाम (जि.पुणे) परिसरात टेकड्यांवरून नैसर्गिकरीत्या वाहणारे अनेक ओढे नाल्यांची दिशा वळवून व नाले बुजवून गृहप्रकल्प सुरू असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे भविष्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला तर पूरसदृश परिस्थिती निर्माण होऊन माळीणसारख्या घटनेची पुनरावृत्ती होऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महर्षीनगर-गंगाधाम चौकात आईमाता मंदिराच्या मागील बाजूने येणाऱ्या कल्व्हर्टरपासून निघालेला नाला बांधकाम व्यावसायिकाने ताब्यात घेतलेला असल्याचेही निदर्शनास, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाब अतिशय गंभीर स्वरुपाची असून याकडे महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असतांना शासनस्तरावरून काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७)** :(१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार नाला वळविण्यात आला आहे. तथापि, कोणताही नाला बुजवण्यात आला नाही.

पुणे पेठ बिबवेवाडी स.नं.५७८/२, या मिळकती मधून पावसाळी पाण्याचा प्रवाह सुरळीत होण्यासाठी मिळकती मधून चर करून पाण्याचा प्रवाह सुरळीत करण्यात आलेला आहे.

विकासकाने नाला विकसित न केल्याने विकासकाला स्टॉप वर्क नोटिस देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पनवेल महानगरपालिकेत विलिन करण्यात आलेल्या २३ ग्रामपंचायतीचे कर्मचारी वेतनापासून वंचित असल्याबाबत**

**(२५) ८६१४० (२३-०८-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नव निर्वाचित पनवेल महानगरपालिकेत २३ ग्रामपंचायतींचे विलिनीकरण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या २३ ग्रामपंचायतीमधील कर्मचा-यांना मागील काही महिन्यांपासून वेतनापासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगारांना पगार न देण्याची कारणे काय आहेत तसेच कर्मचा-यांना तात्काळ पगार अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१७)** :(१), (२) व (३) दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ रोजी पनवेल महानगरपालिका नव्याने स्थापित झाली असून पनवेल महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायतीमधील कर्मचाऱ्यांना पनवेल महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सामावून घेणेबाबत नियमोचित निर्णय घेण्यासाठी विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

उक्त गठीत समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर यथोचित कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच पनवेल महानगरपालिकेने दिनांक ०१.१०.२०१६ ते दिनांक ३०.०९.२०१७ अखेर पर्यंतचे वेतन संबंधित ग्रामपंचायतमधील कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना अदा करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर प्रादेशिक विकास आराखडयामधील त्रुटी दुरुस्तीचे नकाशे उपलब्ध होत नसल्याबाबत**

**(२६) ८६२५२ (२३-०८-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर प्रादेशिक विकास आराखडयामधील त्रुटी दुरुस्तीचे नकाशे उपलब्ध होत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याविरोधात आंदोलन करण्याचा इशारा माहे मे, २०१७ वा त्या दरम्यान असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस अँड इंजिनिअर्स असोसिएशनने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१७) :**(१) प्रारुप प्रादेशिक योजना,कोल्हापूर प्रदेश नियोजन मंडळाने दि. २२/०९/२०१६ रोजी प्रसिध्द करुन त्याबाबत नागरीकांच्या सूचना-हरकतीबाबत आवश्यक ती वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन दि.३०/०३/२०१७ रोजीच्या पत्रान्वये शासनास मान्यतेसाठी सादर केली आहे. प्रादेशिक योजना शासनास मान्यतेसाठी सादर करतेवेळी सदर योजनेमध्ये प्रादेशिक नियोजन मंडळाने काही धोरणात्मक निर्णय व काही शिफारशी सुचविलेल्या असून त्याअनुषंगाने प्रसिध्द प्रारुप प्रादेशिक योजनेच्या नकाशामध्ये काही फेरबदल केले आहेत. सदर प्रादेशिक योजनेची शासन स्तरावर छाननी सुरु आहे. प्रारुप प्रादेशिक योजना, कोल्हापूर प्रदेश या प्रादेशिक योजनेस शासनाची अंतिम मान्यता प्राप्त झाल्यानंतर मंजूर प्रादेशिक योजनेचे दुरुस्त्या दर्शविलेले अधिप्रमाणित नकाशे जनतेस उपलब्ध करुन देता येऊ शकतील.

(२) उपसंचालक, नगर रचना, प्रादेशिक योजना कार्यालय कोल्हापूर यांचेकडे मे, २०१७ व त्या दरम्यानचे कालावधीत असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस अॅड इंजिनिअर्स यांनी आंदोलनासंदर्भात कोणतेही पत्र सादर केलेले दिसून येत नाही.

(३) व (४) कोल्हापूर प्रदेश प्रसिध्द प्रारुप प्रादेशिक योजनेवर संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा अहवाल दि. १२/१०/२०१७ रोजी शासनास प्राप्त झालेला असून सद्यस्थितीत सदर प्रादेशिक योजनेची शासन स्तरावर छाननी सुरु आहे.

---

**पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर, कामोठे, कळंबोली विभागात सिडको प्रशासनामार्फत गृहनिर्माण संस्थेस सामान्य दराने सुधारित पाणी देयके निर्गमित करण्याबाबत**

**(२७) ८६४४१ (२३-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर, कामोठे, कळंबोली विभागात सिडको प्रशासनामार्फत वाणिज्य दराने पाणी पुरवठा केला जात नसूनसुध्दा अनेक गृहनिर्माण सहकारी संस्थांना वाणिज्य दराने पाणी पुरवठयाची आकारण्यात आलेली देयके रद्द करून सामान्य दराने सुधारित पाणी देयके निर्गमित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१७ रोजी वा त्या दरम्यान सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको लि., सीबीडी-बेलापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको प्रशासनामार्फत उक्त विभागातील गृहनिर्माण संस्थेस वाणिज्य दराने पाणीपुरवठा केला जातो किंवा कसे याची खातरजमा न करता अनेक संस्थांच्या विनंती अर्जाची दखल न घेता वाणिज्य दराने पाणी देयके सिडको प्रशासनामार्फत आकारण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सिडको प्रशासनामार्फत गृहनिर्माण संस्थेस सामान्य दराने सुधारित पाणी देयके निर्गमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१७) :**(१) होय.

(२) सिडकोच्या धोरणानुसार जे भूखंडधारक/ विकासक प्रारंभिक प्रमाणपत्र (CC) प्राप्त झाल्यानंतर बांधकामाच्या वापरासाठी नळजोडणीची मागणी करतात, त्यांना सिडकोकडून कमीत कमी १५ मि.मी.व्यासाची तात्पुरत्या स्वरुपाची नळजोडणी वाणिज्य दराने देण्यात येते, तसेच सिडकोकडून भोगवटा प्रमाणपत्र (OC) प्राप्त झाल्यानंतर भूखंडधारकांनी/विकासकांनी मागणी केल्यानंतर कायमस्वरुपी नळजोडणी निवासी दराने देण्यात येते. पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर, कामोठे व कळंबोली येथील काही भूखंडधारक/विकासकांनी बांधकाम पूर्ण करुन भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न करता सदनिकाधारकांना अवैधरित्या सदनिकेचा ताबा दिला व वाणिज्य प्रयोजनार्थ प्राप्त करुन घेतलेली तात्पुरती नळजोडणी कायम ठेवली असल्याने वाणिज्य दराने बिले आकारण्यात आली आहेत.

पायाभूत सुविधा शुल्क भरणा केल्यानंतर व इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतर कायमस्वरुपी नळजोडणीसाठी सिडकोकडून निवासी दराने पाण्याचे बील आकारले जाते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा व मोताळा (जि.बुलडाणा) अंतर्गत अनेक अकृषक प्रकरणे ना हरकत प्रमाणपत्रे नगररचनाकार कार्यालय, बुलडाणा यांचेकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(२८) ८६५९७ (२३-०८-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा व मोताळा तालुका (जि.बुलडाणा) अंतर्गत अनेक अकृषक प्रकरणे ना हरकत प्रमाणपत्रे नगररचनाकार कार्यालय, बुलडाणा यांचेकडे प्रलंबित असल्याची बाब दिनांक १३ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्थिक लाभासाठी अकृषक बाबतचे ना हरकत प्रस्ताव हेतूपुरस्सर प्रलंबित ठेवले जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच अकृषक प्रस्ताव बाबतचे ना हरकत प्रमाणपत्र त्वरित अदा करणे बाबत तथा सदर प्रकरण हेतूपुरस्सर प्रलंबित ठेवणाऱ्यांवर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७)** :(१) दिनांक १३ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास बुलडाणा तालुक्यातील तीन अकृषक प्रकरणांत छाननी शुल्काचा भरणा न झाल्यामुळे नाहरकत/अभिप्राय कळविलेला नव्हता तर मोताळा तालुक्यातील एकही अकृषक प्रकरण प्रलंबित नव्हते.
(२) नाही, अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळमनुरी (जि.हिंगोली) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत सुरु असलेले पाण्याच्या टाकीचे काम निकृष्ट असल्याबाबत**

**(२९) ८६८९९ (२१-०८-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमनुरी (ता.जि.हिंगोली) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातंर्गत सुरु असलेले नवीन पाण्याच्या टाकीचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे तेथील ग्रामस्थांनी दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पाण्याच्या टाकीचे काम योग्य रितीने होण्याकरिता कोणती कार्यवाही केली तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-११-२०१७)** :(१) शेख अय्युब शेख खलील, कळमनुरी जि.हिंगोली यांनी अशा आशयाचे निवेदन जिल्हाधिकारी, हिंगोली यांना दिले आहे, हे खरे आहे.
(२) सदर निवेदनात नमूद तक्रारीच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, परभणी यांच्यामार्फत दिनांक १५ जून, २०१७ रोजी चौकशी करण्यात आली.

चौकशी अहवालानुसार प्रत्यक्ष घेण्यात आलेल्या चाचण्यांचे निष्कर्ष व कामाची भौतिक पाहणी करुन झालेल्या कामाचा दर्जा चांगला असल्याचे आढळले असल्याचे जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा शहरातील (जि.अहमदनगर) रस्त्यांची मोठया प्रमाणात दुरवस्था झाल्याबाबत**

**(३०) ८७७५० (२३-०८-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदा शहरातील (जि.अहमदनगर) रस्त्यांची मोठया प्रमाणात दुरवस्था झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७) :**(१) श्रीगोंदा नगरपरिषदेने UIDSSMT योजनेंतर्गत पाणी पुरवठा करण्यासाठी पाईपलाईनचे काम करण्यात आल्यामुळे रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत. ही वस्तुस्थिती आहे.
(२) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) योजनेंतर्गत १७ रस्त्यांचे काम हाती घेण्यात आले असून, त्याअंतर्गत खड्डे बुजविण्यात आलेले आहेत. सदर रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धारावी (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या तमीळ शाळेची मोठया प्रमाणात दुरवस्था झाली असल्याबाबत**

**(३१) ८८०७३ (२३-०८-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धारावी (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या तमीळ शाळेचे बांधकाम करणे आवश्यक असताना केवळ नुतनीकरण करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत सदर शाळा इमारतीची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर शाळेचे केवळ नुतनीकरण न करता पुन्हा बांधकाम करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-११-२०१७) :**(१) व (२) दिनांक २२.०६.२०१६ रोजीच्या "पुढारी" या दैनिक वृत्तपत्रात धारावीत पालिकेची शाळा विद्यार्थ्यांसाठी धोकादायक" अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.

तथापि, महानगरपालिकेमार्फत जुलै, २०१६ मध्ये करण्यात आलेल्या पाहणीमध्ये सदर कन्नडी चाळ महानगरपालिका शाळेची तातडीने दुरुस्ती करण्याची गरज असल्याचे आढळून आले आहे.

(३) व (४) सदर शाळेच्या पाहणीच्या निष्कर्षानुसार शाळेच्या इमारतीची दुरुस्ती, पुनर्वसन व दर्जोन्नतीच्या कामासाठी महानगरपालिकेमार्फत कंत्राटदारास दिनांक ०९.०१.२०१७ रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

सदर इमारतीचे काम दिनांक ०१.०३.२०१७ पासून सुरु करण्यात आले असून, सद्य:स्थितीत ९०% काम पूर्ण झाले आहे.

---

## ठाणे महानगरपालिका रुग्णालयातील क्षयरोग विभागातील करार तत्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना समान वेतन लागू करण्याबाबत

**(३२) *८८२४५* (२३-०८-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका रुग्णालयात क्षयरोग विभागातील करार तत्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना इतर महानगरपालिकेतील कर्मचा-यांच्या वेतनाच्या इतके वेतन व पोषक आहार जोखीम भत्ता दिला जात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयात सी.बे.एन.ए.ए.टी मशीनमुळे टी.बी व एम डी रुग्णाचे दोन तासात निदान होत असल्याने रुग्णांच्या संख्येत वाढत असून अपु-या मनुष्यबळामुळे सदर कर्मचाऱ्यांवर अधिक ताण पडून त्यांचे आरोग्य धोक्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, क्षयरोग,एम.डी.आर.,एक्स. डी आर एड्स बाधित रुग्णांच्या सततच्या संपर्कामुळे आजाराचा धोका निर्माण होत असताना अशा कर्माचा-यांना जोखीम भत्ता दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासन संबंधित कर्मचा-यांना समान कामासाठी समान वेतन लागू करणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

कंत्राटी पध्दतीने पर्याप्त मनुष्यबळ उपलब्ध करण्यात आले आहे. उक्त कर्मचारी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असल्याने त्यांना भत्ते अथवा नियमित वेतनश्रेणी अनुज्ञेय नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**ठाणे महानगरपालिकेची भाईंदरपाडा येथील मालकीची जागा मैदानासाठी आरक्षित असताना अल्पदरात विकासकाला देण्याचा ठराव संमत करण्यात आल्याबाबत**

**(३३) ८८२४७ (२३-०८-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेची भाईंदरपाडा येथील मालकीची जागा मैदानासाठी आरक्षित असताना अल्पदरात विकासकाला देण्याचा ठराव माहे मे,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान संमत केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जागा देण्याबाबत ठरावात अनियमितता व लोकप्रतिनिधींनी आक्षेप नोंदविलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जागा ही मैदानासाठीच आरक्षित ठेवावी अशी नागरिकांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन सदर ठरावास स्थगिती देऊन चौकशी करणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१७) :**(१), (२) व (३) सदरचा प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेच्या प्रशासनाने महासभेसमोर विचारार्थ ठेवला होता. परंतु, चर्चा न झाल्याने तसेच प्रसारमाध्यमांनी/लोकप्रतिनिधींनी सदर प्रस्तावास केलेला विरोध/तक्रारी विचारात घेता उक्त प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेच्या प्रशासनाने मागे घेतला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिका कर्मचारी वसाहतमधील बैठ्या चाळीतील घरे मालकी हक्क तत्वावर देऊन पुनर्विकास करण्याबाबत**

**(३४) ८८३४१ (२३-०८-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या चेंबूर, देवनार, घाटकोपर, बर्वेनगर, विक्रोळी पार्कसाईट, मालाड मालवणी, गोरेगांव मिटानगर येथील कर्मचारी वसाहतीमधील बैठ्या चाळीतील घरे मालकी हक्क तत्वावर देऊन या कर्मचारी वसाहतींचा पुनर्विकास करण्यास शासनाने दिनांक ०३ मे, २०१७ रोजी निर्णय घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महानगरपालिका कर्मचारी वसाहतीचा पुनर्विकासाचा आराखडा तयार करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, पुनर्विकास कामाचे स्वरुप काय आहे व किती कालावधीत हे काम पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-११-२०१७) :**(१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या चेंबूर, देवनार, घाटकोपर, बर्वेनगर, विक्रोळी पार्कसाईट, मालाड मालवणी, गोरेगांव मिठानगर या महानगरपालिकेच्या कॉलनीमधील लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर दिलेल्या बैठया चाळी मालकी हक्क तत्वावर करण्याबाबत दिनांक ०३ मे, २०१७ रोजीच्या बैठकीतील सुचनांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सर्व्हेक्षण करण्यात येत आहे.

---

**मुंबई म्हाडाच्या वतीने तात्पुरत्या वास्तव्यासाठी बांधण्यात आलेल्या ३० संक्रमण शिबिरांच्या जमिनीवर पंतप्रधान आवास योजना राबविण्याबाबत**

**(३५) ८८६९१ (०१-०९-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत म्हाडाच्या वतीने तात्पुरत्या वास्तव्यासाठी बांधण्यात आलेल्या ३० संक्रमण शिबिरांच्या जमिनीवर पंतप्रधान आवास योजना राबविण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनापुढे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संक्रमण शिबिरातील घुसखोरांना काही किंमत आकारून त्या योजनेतील घरे विकत देण्याचे विचारात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीनुसार पात्र नागरिकांना घरे देऊन घुसखोरांवर कारवाई करण्याबाबत शासन काय कारवाई करीत आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२५-१०-२०१७) :**(१), (२) व (३) पंतप्रधान आवास योजनेंतर्गत संक्रमण शिबीरांचा पुनर्विकास करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई पश्चिम उपनगरातील गोरेगाव-मुलुंड लिंक रोड येथे बांधण्यात येणाऱ्या पूलाचे बांधकाम इंदिरा गांधी सायन्स इन्स्टिटयुटपर्यंत विस्तारित करण्याबाबत**

**(३६) ८९१४२ (२३-०८-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पश्चिम उपनगरात गोरेगाव-मुलुंड लिंक रोड, जनरल अरुणकुमार वैद्य मार्गावर एमएमआरडीएतर्फे रत्नागिरी जंक्शनवर मोठा पुल बांधण्यात येत असून सदर पूल आरे भास्करपर्यंत नेण्याचे प्रस्तावित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरे भास्कर जंक्शन येते होत असलेली वाहतूक कोंडी व नागरीकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी सदरहू प्रस्तावित पूल इंदिरा गांधी सायन्स इन्स्टिटयुट पर्यंत नेण्यात यावा अशी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांनी मागणी केली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी शासनातर्फे बांधण्यात येत असलेल्या प्रस्तावित पूलाचे बांधकाम आरे भास्कर जंक्शन पासून इंदिरा गांधी इन्स्टिटयुटपर्यंत विस्तारित करण्याच्या दृष्टीने शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) असल्यास, सदरहू पुलाचे विस्तारीकरण करण्याकरीता शासनातर्फे करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-११-२०१७) :**(१) गोरेगांव-मुलुंड लिंक रोडवरील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून प्रस्तावित बोगद्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

सदर बोगद्याचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर रस्त्यावरील भविष्यकालीन होणाऱ्या वाहतुकीची वाढ लक्षात घेता, प्रस्तावित केलेल्या दिर्घकालीन उपायांमध्ये रत्नागिरी हॉटेल जंक्शन येथे उड्डाणपुल प्रस्तावित करण्यात आला आहे.
(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नेमणुक केलेल्या सल्लागारामार्फत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या मागणीचा तांत्रिक अभ्यास करुन त्याची व्यवहार्यता पडताळण्यात आली आहे.

त्यानुसार सदर सल्लागारास प्रस्तावित उड्डाणपुलाचा सामान्य व्यवस्था आराखडा तयार करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आलेले आहे.

---

## नवी मुंबईतील खारघर येथील भूमिपुत्र आदिवासी बांधवांना पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत असल्याबाबत

**(३७) ८९४२४ (२३-०८-२०१७). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईत स्मार्ट सिटी म्हणून खारघर नावारूपाला येत असताना या ठिकाणच्या भूमिपुत्र आदिवासी बांधवांना पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावातील विहिरी कोरड्या पडल्या असून सिडको प्रशासन मात्र या आदिवासी पाड्यांकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आदिवासी पाड्यांना तातडीने पाणीपुरवठा करण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार वा करित आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१७)** :(१), (२) व (३) हे खरे नाही. सिडको अंतर्भूत क्षेत्रात खारघर व लगतच्या परिसरातील १५ गावे व ३ आदिवासी पाडे येत असून या सर्व गावांना सिडकोच्या जल वाहिनीतून टॅपींग पॉईंट पर्यंत होणारा पाणी पुरवठा सद्यस्थितीत व्यवस्थितपणे सुरु आहे. दरम्यान, दि.२६.९.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही गावे दि.१.१०.२०१६ पासून पनवेल महानगरपालिका क्षेत्रात अंतर्भूत झाली असल्याने सदरहू पाणी पुरवठा व्यवस्था पनवेल महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सिडकोमार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे व मुलुंड रेल्वे स्टेशन दरम्यान विस्तारित ठाणे रेल्वे स्टेशन उभारण्यात येणार असल्याबाबत**

**(३८) ८९४४४ (२३-०८-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे व मुलुंड रेल्वे स्टेशन दरम्यान विस्तारित ठाणे रेल्वे स्टेशनसाठी शासकीय मनोरुग्णालयाच्या जागेचा वापर करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नवीन स्थानक किती कालावधीत उभारण्यात येणार आहे,
(३) असल्यास, नवे स्टेशन उभारण्यासाठी आरक्षण बदलणे, निधीची तरतूद करणे इत्यादीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१७)** :(१) होय.
(२) सदर स्थानक उभारणे करीता ५ वर्ष इतका कालावधी अपेक्षित आहे.
(३) याप्रकरणी मंजुर विकास आराखड्यात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेच्या प्रस्तावास महासभा ठराव क्र.३९, दिनांक २०.०४.२०१७ अन्वये मंजुरी दिली आहे. सदर मंजुरीच्या अनुषंगाने फेरबदलाबाबतची वैधानिक कार्यवाही सुरु आहे. सदर प्रकल्पास स्मार्ट सिटी अंतर्गत निधी मंजुर झाला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नायर रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांसाठी रुग्णालयाच्या आवारात कायमस्वरुपी विश्रांती कक्ष बनविण्याबाबत**

**(३९) ८९६३० (२३-०८-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायर रुग्णालयात कर्करोगावरील केमोथेरपी व अन्य उपचाराकरीता मुंबई बाहेरुन येणाऱ्या रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णासोबत येणाऱ्या नातेवाईकांना विश्रांतीसाठी नायर रुग्णालयाच्या आवारात विश्रांती कक्ष नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णांच्या नातेवाईकांसाठी नायर रुग्णालयाच्या आवारात किंवा परीसरात कायमस्वरुपी विश्रांती कक्ष बनविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) कर्करोगावरील केमोथेरपी उपचारासाठी रुग्णांसोबत येणाऱ्या नातेवाईकांकरिता नाममात्र भाडे आकारुन विश्रांतीगृहाची सोय करण्याकरिता नायर रुग्णालयाच्या आवारात किंवा जवळपास मोकळी जागा उपलब्ध नाही.

तथापि, सदर ठिकाणी येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी नाना पालकर स्मृती समिती (परळ) व संत गाडगेमहाराज संस्था (भायखळा/दादर) यांचेमार्फत विश्रांतीची सोय करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुर्ला पश्चिम (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या नऊ इमारतींचे चुकीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन विकासकाच्या फायदयासाठी धोकादायक ठरविल्याबाबत

**(४०) ९००२७ (२३-०८-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्ला पश्चिम (मुंबई) मॅच फॅक्टरी लेन, श्रीकृष्ण चौक येथील महानगरपालिकेच्या नऊ इमारती सुस्थितीत असतांनाही मुंबई महानगरपालिकेने चुकीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन विकासकाच्या फायदयासाठी धोकादायक ठरविल्याची गंभीर बाब दिनांक ०७ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू इमारती सुस्थितीत असल्याने त्या पाडून नवीन बांधण्यास स्थानिक रहिवाशांनी सक्तीच्या स्थलांतरणास तीव्र विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त इमारत सुस्थितीत असतानाही महानगरपालिका प्रशासनाने धोकादायक ठरविण्याची सर्वसाधारण काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणात संबंधीत महानगरपालिका अधिकारी विकासकाशी संगनमत करुन सक्तीने पुनर्विकास प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्थानिक रहिवाशांना योग्य न्याय देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे तसेच चुकीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन इमारत धोकादायक ठरविणा-या विकासक व महानगरपालिका अधिका-यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०१७)** :(१), (२), (३) व (४) कुर्ला येथील मॅच फॅक्टरी लेन, श्रीकृष्ण चौक येथील ३० वर्षांपूर्वी बांधलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या ५ इमारतींमध्ये २८० भाडेकरु राहतात.

सदर इमारतींच्या सन २०१४ मध्ये महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या संरचनात्मक परिक्षणाच्या अहवालामध्ये, सदर इमारती या मोडकळीस आल्या असून त्यामध्ये मोठया प्रमाणावर दुरुस्ती करणे गरजेचे असल्याचे सुचविण्यात आले होते.

त्यामुळे सदर इमारतींच्या दुरुस्तीचे काम मे. पी. बी. कन्स्ट्रक्शन यांना देण्यात आले होते. तथापि सदर इमारतींमधील रहिवाशांकडून विरोध दर्शविण्यात आल्याने, दुरुस्तीचे काम होऊ शकले नाही.

या दरम्यान दोन ते अडीच वर्षाचा कालावधी उलटून गेल्यामुळे सन २०१६ मध्ये महानगरपालिकेमार्फत सदर इमारतींचे पुन्हा संरचनात्मक परीक्षण करण्यात आले.

सदर संरचनात्मक परिक्षण अहवालाप्रमाणे, सदर इमारतींच्या दुरुस्तीची किंमत ही पुनर्बांधणीच्या किंमतीच्या ४५% जास्त असल्याकारणाने महानगरपालिकेच्या धोरणानुसार, सदर इमारती निष्कासित करुन महानगरपालिकेमार्फत सदर इमारतींची पुनर्बांधणी करणे उचित ठरेल असे सुचविण्यात आले.

(५) व (६) सदर इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना महानगरपालिकेमार्फत माहुल येथे स्थलांतरीत करण्यात येणार होते.

तथापि सदर रहिवाशांनी माहुल येथे स्थलांतरीत होण्यास नकार दर्शविला आहे.

---

## मुंबईतील महानगरपालिका शाळांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहारासाठी सन २०१७-१८ सालासाठी तरतूद केली नसल्याबाबत

**(४१) ९०१०२ (२३-०८-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महानगरपालिका शाळांना दिला जाणाऱ्या पोषण आहारासाठी सन २०१७-१८ सालासाठी तरतूद केली नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेतील शाळांना पोषण आहारासाठी तरतूद न करण्यामागील कारणे काय व याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शाळेतील विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-११-२०१७)** :(१) व (२) शालेय पोषण आहार ही केंद्र शासन पुरस्कृत योजना असून, सदर योजनेंतर्गत अन्न शिजवून वितरीत करण्याकरिता केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडून ६०:४० या प्रमाणात अनुदान मंजूर केले जाते.

सदर योजनेंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सादर करण्यात आलेले सन २०१७-१८ चे वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक शिक्षण संचालक यांचेमार्फत मंजुर करण्यात आले आहे.
(३) शिक्षण संचालक यांच्या आदेशानुसार सन २०१७-१८ या वर्षासाठी दिनांक १५.०६.२०१७ पासून नियमितपणे आहार वितरण सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) मधील वालधुनी नदी साफसफाईसाठी नियुक्त केलेल्या ठेकेदाराने कामामध्ये गैरव्यवहार केल्याबाबत**

**(४२) ९०३२३ (२३-०८-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) मधील वालधुनी नदी साफसफाईसाठी नियुक्त केलेल्या काळया यादीतील ठेकेदाराने करोडो रूपये घेऊन साफसफाई कामामध्ये गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिका प्रशासनातील अधिकारी आणि ठेकेदार यांचेमध्ये संगनमत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०१७) :**(१) उल्हासनगर येथील वालधुनी नदीच्या साफसफाईसाठी स्वतंत्र ठेकेदाराची नेमणुक करण्यात आलेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) सदर प्रकरणी उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत (जि.ठाणे) नव्याने समाविष्ट २७ गावांतील पाणी पुरवठ्याबाबत**

**(४३) ९०४०३ (२३-०८-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत (जि.ठाणे) नव्याने समाविष्ट २७ गावांतील पाणीपुरवठा वाढविल्यानंतरही पाणीपुरवठा अपुऱ्या दाबाने होत असल्याने नागरीकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी नव्याने समाविष्ट गावांतील नागरीकांना तातडीने न्याय देण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-१०-२०१७) :**(१) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत जून, २०१५ मध्ये समाविष्ट केलेल्या २७ गावांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत ३५ द.ल.लि. पाणी पुरवठा करण्यात येत होते.

• तथापि, झपाटयाने वाढत असलेल्या नागरीकरणामुळे सदर गावांना अपूरा पाणी पुरवठा होत होते असे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) • मा.मंत्री, जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखाली माहे सप्टेंबर, २०१६ व माहे जुलै, २०१७ मध्ये झालेल्या बैठकांतील निर्णयानुसार सदर गावांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत अतिरिक्त पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

• सदर गावांची सन २०४९ ची लोकसंख्या विचारात घेऊन केंद्र शासनाच्या अमृत योजनेंतर्गत रु.१८०.८१ कोटीच्या पाणी पुरवठा योजनेस माहे ऑगस्ट २०१७ मध्ये मान्यता देण्यात आली आहे.

• सदर योजनेची निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## वसई-विरार शहर महानगरपालिकेमधील बहुसंख्य उपायुक्तांची पदे रिक्त असल्याबाबत

**(४४) ९०९३७ (२३-०८-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेमधील बहुसंख्य उपायुक्तांची पदे दीर्घकाळपासून रिक्त असून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कमतरतेमुळे शहर प्रशासनाच्या कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे ही बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी मागणी करुन देखील शासनाने अद्यापी संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना महानगरपालिकेच्या प्रतिनियुक्तीवर पाठविलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१७) :**(१) होय.

(२), (३) व (४) वसई-विरार महानगरपालिकेतील उपायुक्तांची पदे शासन स्तरावरुन भरण्याची कार्यवाही करण्यात येत असून, त्यासंदर्भात नगर विकास विभागाने दि.१४.०७.२०१७ च्या शासन आदेशान्वये विविध महानगरपालिकांमधील उपायुक्तांची रिक्त पदे प्रतिनियुक्तीने भरण्याच्या दृष्टीने जाहिरात प्रसिद्ध केलेली आहे. सदर जाहिरातीनुसार प्राप्त झालेले अधिकाऱ्यांचे अर्जावर छाननीअंती विहित प्रक्रिया अवलंबून वसई-विरार महानगरपालिकेमध्ये उपायुक्तांच्या रिक्त पदावर अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्त्या करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**बोरीवली (मुंबई) येथे दफनभूमीसाठी जागा देणेबाबत**

**(४५) ९१३०४ (२३-०८-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली (मुंबई) येथील दौलतनगरमधील दफनभूमीत मृतदेह दफन करण्यासाठी जागा शिल्लक नसल्याने मृतदेह एकावर एक रचावे लागत असून अनेकदा ते व्यवस्थित दफन केले जात नसल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दफनभूमीसाठी जागा देणेबाबत शासनस्तरावरुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) सदर विभागातील नागरिकांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बोरीवलीलगत दहिसर येथे हिंदू स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बोरीवली (मुंबई) येथील गोराई-मनोरी येथे अग्निशमन केंद्रासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४६) ९१८१३ (२३-०८-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली (मुंबई) येथील गोराई-मनोरी येथे मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती असून त्या परिसरात स्थानिक नागरिकांकडून शासनाकडे अग्निशमन केंद्रासाठी जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी सातत्याने करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी वा पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसरात वाढती नागरिकांची लोकसंख्या पाहता अग्निशमन केंद्रासाठी तात्काळ जागा उपलब्ध करुन देण्यासाठी शासन कोणती कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) गोराई-मनोरी या परिसराची अग्निशमन केंद्र उभारण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई अग्निशमन दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत पाहणी करण्यात आली आहे.

(३) व (४) गोराई-मनोरी येथे मिनी फायर स्टेशन उभारण्याकरिता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्या मालकीची मोकळी जागा उपलब्ध करुन देण्याची विनंती पर्यटन विभागास करण्यात आली आहे.

---

**गोरेगांव (पश्चिम) येथील इमारतीसाठी अग्निशमन दलाचे अंतिम ना हरकत प्रमाणपत्र आणि आराखडा उपलब्ध नसतांना महानगरपालिकेकडून ताबा प्रमाणपत्र देण्यात आल्याबाबत**

**(४७) ९२३०८ (२३-०८-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगांव (पश्चिम) येथील ९० फुट रोडवरील सीटीएस क्रं. १ए/ए/बी/२ येथील इमारतीसाठी अग्निशमन दलाचे अंतिम ना हरकत प्रमाणपत्र आणि आराखडा उपलब्ध नसतांना महानगरपालिकेकडून ताबा प्रमाणपत्र देण्यात आले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या पश्चिम उपनगरे पी वॉर्ड (इमारत प्रस्ताव) विभागाच्या रेकॉर्डवर असलेल्या इमारतीच्या कागदपत्राच्या फाईलमध्ये अग्निशमन दलाचे अंतिम ना हरकत प्रमाणपत्र नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ६ नोव्हेंबर, २०१३ रोजी वा त्या सुमारास सदर इमारतीला महानगरपालिकेतील अधिका-यांनी ताबा प्रमाणपत्र दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती महानगरपालिकेच्या अधिका-यांवर तसेच माहिती अधिकारात सदर इमारतीची माहिती मागवली असता आपले नाव न देता कागदपत्रे उपलब्ध नसल्याची माहिती देणा-या पहिल्या अपिलीय अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०१७)** :(१), (२) व (३) सदर इमारतीस बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत दिनांक ०५.०३.२०१३ रोजी अंतिम ना-हरकत प्रमाणपत्र व महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागामार्फत दिनांक ०६.११.२०१३ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(४) सदर प्रकरणी अर्जदाराने माहितीचा अधिकार कायदा २००५ अन्वये सादर केलेल्या अर्जास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अपेक्षित व सत्य माहिती तसेच कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईला पाणीपुरवठा करणा-या वैतरणा धरणात रात्रीच्या वेळेस विषारी द्रव्यांचा वापर करुन मासेमारी करण्यात येत असल्याबाबत**

**(४८) ९३०४९ (२३-०८-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईला पाणीपुरवठा करणा-या वैतरणा धरणात रात्रीच्या वेळेस विषारी द्रव्यांचा वापर करुन मासेमारी केली जात असल्याचे दिनांक २३ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकारामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्यामुळे शासनाने याबाबतची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-११-२०१७)** :(१) उर्ध्व वैतरणा धरण येथे रात्रीच्या वेळेस विषारी द्रव्यांचा वापर करुन मासेमारी केली जात असल्याबाबतचे वृत्त दिनांक २३.०६.२०१७ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रात आले होते ही वस्तुस्थिती आहे.

(२) दिनांक २७.०६.२०१७ रोजी उर्ध्व वैतरणा धरणातील पाण्याचे नमुने गोळा करुन तपासणी केली असता त्यात कुठल्याही प्रकारची विषारी द्रव्ये आढळून आली नाहीत.

त्यामुळे सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत विकासक मोठया प्रमाणात अवैध बांधकाम करून नागरिकांची फसवणूक करीत असल्याबाबत**

**(४९) ९३४२३ (२३-०८-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरात विकासकांनी अधिका-यांच्या संगनमताने मोठया प्रमाणात अवैध बांधकाम करून सदनिका लाखो करोडो रूपयांना विकून हजारो नागरिकांची फसवणूक केली असून माहे एप्रिल, २०१६ ते एप्रिल, २०१७ या १३ महिन्यांच्या कालावधीमध्ये तब्बल ११ हजार ४१३ अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेने पाडलेली असल्याची धक्कादायक माहिती माहे जून, २०१७ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यवाहीत मोठ्या विकासकांची अवैध बांधकामे पाडण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई परिसरात अधिका-यांच्या संगनमताने विकासकांकडून मोठया प्रमाणात अवैध बांधकाम करण्यात आली आहेत अशा विकासकांवर व त्यांच्या बांधकामाबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-११-२०१७) :**(१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत एप्रिल २०१६ ते एप्रिल २०१७ या कालावधीमध्ये ३६६५ निवासी, २५०६ अनिवासी व ५२५९ झोपडया अशी एकूण ११,४३० अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली आहेत.

विकासकांनी अनधिकृत बांधकाम केल्याचे आढळून आल्यास महानगरपालिकेमार्फत सदर अनधिकृत बांधकामांवर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन कारवाई करण्यात येते.

---

**पुणे शहरात विविध भागातील रस्त्यावर परवानगी नसताना अनधिकृतपणे व्यावसायिकांना वापरासाठी जागा देण्यात असल्याबाबत**

**(५०) ९४८६० (२३-०८-२०१७). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात विविध भागातील रस्त्यावर परवानगी नसताना अनधिकृतपणे व्यावसायिकांना वापरासाठी जागा देण्यात आल्याचे महानगरपालिका सर्वसाधारण सभेमध्ये माहे जून,२०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरात २९ रस्ते नॉन कमर्शियल व नॉन शॉपिंग आहेत असे असतानाही त्यांना परवाने देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या रस्त्याच्या भागात बांधकाम व्यवसायिकांना परवानगी देता येत नाही तरीही याच रस्त्याच्या भागात अनधिकृत दुकाने असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे काय,
(४) असल्यास, अनधिकृत दुकानावर व नियम डावलून दुकानांना परवानगी देणाऱ्या महानगरपालिका प्रशासनावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७) :**(१), (२), (३) व (४) पुणे पेठ येरवडा, कळस, धानोरी (जुनी हद्द) या कार्यक्षेत्रातील मान्य विकास आराखडा सन १९८७ मधील नॉन शॉपिंग, नॉन कमर्शिअल रस्त्यालगत असलेल्या मिळकतीवर शॉप्सकरिता थेट ॲक्सेस दर्शवून परवानग्या देण्यात आलेल्या नाहीत. सदर रस्त्यालगत असलेल्या मिळकतीवर व्यावसायिकांना परवानगी देता येत नाही. तरीही याच रस्त्याच्या भागात अनधिकृत दुकाने असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने वेळोवेळी सर्व्हे करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (१) व ५२ अन्वये नोटीस बजावून संबंधित गाळेधारकांवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात आलेली आहे.

दरम्यानच्या काळात मान्य विकास आराखडा सन २०१७ सदरचे रस्ते नॉन शॉपिंग, नॉन कमर्शिअल मधून वगळण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.